महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र.तंशिप्र-१२२६/ प्र.क्र. ७/ प्रवेश प्रक्रिया/२०२६/२१३५ दिनांक: ०२/०९/२०२६

# परिपत्रक

## तंत्रशिक्षण विभागाअंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमांच्या संस्थास्तरीय जागा आणि कॅप (CAP) फेऱ्यांनंतर उर्वरित रिक्त जागांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत संबंधित सर्व संस्था, विद्यार्थी व पालकांसाठी सूचना

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियामध्ये सर्व सहभागी संस्था, उमेदवार व पालकांना याद्वारे सूचित करण्यात येते की, संस्थात्मक कोटा (Management Quota) आणि केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेच्या (CAP) फेऱ्यांनंतर रिक्त राहणाऱ्या (ACAP) जागांसाठीच्या संस्थास्तरीय प्रवेश प्रक्रियेबाबत माहिती पुस्तिकेत (Information Brochure) दिलेल्या निर्देशांचे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे, याकरीता खालीलप्रमाणे कार्यवाही अवलंबवावे.

- महाविद्यालयांनी संस्थास्तरीय प्रवेश प्रक्रिया माहिती पुस्तिकेतील नियम १३ नुसारच राबवणे बंधनकारक आहे. केंद्रीभूत प्रवेश प्रकियेच्या सर्व फेऱ्या पूर्णपणे समाप्त झाल्यानंतरच संस्थास्तरीय प्रवेश प्रक्रिया आयोजित केली जावी. सर्व जागांचे वाटप अर्जदार उमेदवारांच्या गुणवत्तेनुसारच (Inter-se Merit) केले जावे.
- उमेदवारांना प्रक्रियेत सहभागी होणे सुलभ व्हावे म्हणून महाविद्यालयांनी आपले प्रवेश नियम, कार्यपद्धती आणि माहिती पुस्तिका त्यांच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे अनिवार्य आहे.
- इच्छुक उमेदवार थेट संबंधित महाविद्यालयात अर्ज करू शकतात किंवा त्यांच्या कॅप पोर्टल लॉगिनद्वारे संस्थास्तरीय पर्याय अर्ज (Option Form) सादर करू शकतात.
- यानंतर महाविद्यालयांनी थेट आलेले अर्ज आणि सीईटी कक्षाकडून मिळालेली उमेदवार यादी या दोन्हीचा विचार करून अधिकृत गुणवत्ता याद्या (Merit List) प्रवर्गानुसार तयार कराव्यात.
- सदर गुणवत्ता याद्या महाविद्यालयाच्या सूचना फलकावर आणि अधिकृत संकेतस्थळावर प्रदर्शित करणे अनिवार्य आहे.
- प्रत्यक्ष उपस्थित राहिलेल्या (Attended) आणि प्रवेश निश्चित केलेल्या (Admitted) विद्यार्थी/पालक/नातेवाईकांची दैनंदिन नोंद **प्रत्येक दिवशी** प्रवेश प्रक्रियानंतर अहवाल सीईटी/प्रवेश नियामक प्राधिकरण यांस ई-मेलद्वारे पाठविण्यात यावे.

तक्ता-१

| List of Attended Students Datewise Report (ACAP) | | | | | | Date- | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | College Merit List No. | Candidate Name | CET General Merit No. | Percentile | Admitted or Not (Yes/No) | Allotted Branch | Resaon for Not Admision |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| | | | | | | | |

तक्ता-२

| List of Attended Students Datewise Report (Institute Level Seats/ Managment Quota) | | | | | | Date- | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | College Merit List No. | Candidate Name | CET General Merit No. | Percentile | Admitted or Not (Yes/No) | Allotted Branch | Resaon for Not Admision |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| | | | | | | | |

- विद्यार्थ्याचा प्रवेश निश्चित झाल्यानंतर, संस्थेने तो प्रवेश तात्काळ अधिकृत कॅप पोर्टलवर नोंदवणे, तसेच सीईटी कक्षास कळविणे बंधनकारक आहे.
- पारदर्शकता, निष्पक्षता आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करण्यासाठी, निवडक खाजगी महाविद्यालयांमधील संस्थास्तरीय फेऱ्यांसाठी नजीकच्या शासकीय महाविद्यालयातील प्राचार्य, संचालक किंवा वरिष्ठ प्राध्यापकांची निरीक्षक (Observer) म्हणून नियुक्ती केली जाईल. हे निरीक्षक कागदपत्र पडताळणी, गुणवत्ता यादी तयार करणे, शुल्क भरणा आणि जागा वाटप यावर देखरेख ठेवतील आणि दररोज प्रक्रिया पूर्ण झाल्यावर सक्षम प्राधिकरणाकडे अनुपालन अहवाल सादर करतील.
- या व्यतिरिक्त, संपूर्ण प्रवेश प्रक्रिया, विशेषतः कागदपत्र पडताळणी व जागा वाटप खोली/ हॉल सीसीटीव्ही देखरेखीखाली असावी.सदर सीसीटीव्ही व्हिडिओ रेकॉर्डिंग विहित मुदतीसाठी सुरक्षित ठेवावे आणि ते तपासणी, ऑडिट किंवा तक्रार निवारणासाठी सक्षम प्राधिकरणाने मागितल्यास, महाविद्यालयाने उपलब्ध करून द्यावे.

**उमेदवार आणि पालकांना कळविण्यात येते की, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया फेऱ्या पूर्ण होण्यापूर्वी जागा मिळवून देण्याचा दावा करणाऱ्या एजंट, मध्यस्थ किंवा खाजगी समुपदेशकांच्या अवाजवी प्रलोभनांना किंवा खोट्या आश्वासनांना बळी पडू नये. सोशल मीडिया किंवा खाजगी लिंक्सद्वारे पसरवल्या जाणाऱ्या दिशाभूल करणाऱ्या माहितीपासून सावध राहा. प्रवेश प्रक्रियेबाबतची सर्व माहिती केवळ सीईटी कक्षाच्या किंवा संबंधित संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावरून तपासून घ्यावी.**

संबंधित संस्थांनी माहिती पुस्तिकेतील (Information Brochure) नियमांचे तंतोतंत पालन करूनच प्रवेश प्रक्रिया राबवणे बंधनकारक आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारची त्रुटी किंवा दुर्लक्ष आढळल्यास, संबंधित संस्थेवर तात्काळ कठोर कायदेशीर व प्रशासकीय कारवाई करण्यात येईल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

सही/-
(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा
(सीईटी) कक्ष, मुंबई